## प्रकरण दुसरे

## मराठीतील ललित गद्याची वाटचाल

ललितगद्य हा " मी " चा घेतलेला जाणीवनिष्ठ शोध असतो. त्यांत " मी " ची विविधरूपे असतात. " मी " च्या निरागसपणापासून तो " मी " च्या समग्र जाणिवांचा रमणीय विलास त्यांत असतो. त्यांतला "मी" केवळ कौटुंबिक, सामाजिक असत नाही, तर निसर्गातिलाही असतो. " ललित गद्यातल्या मनाला सर्व पातळयावर जाता येते. ते मुक्तपणे " मी "चा शोध घेते. अनुभवाची विविध रूपे " मी " कडून ललितगद्यांत कळत-नकळत सांगितली जातात. यांतील मन जाणीवनेणिवेच्या पातळीवर काम करते. हा अनुभव वाचकमनाला थक्क करतो. सहज प्रकटलेल्या अनुभवांत लेखकमनाचे चिंतन असते. यांत मानवी विकार व्यक्त होतात नि सार्वकालिन वृत्ती आढळतात. ललितगद्यांतील आशय या वृत्तिविशेषांशी संलग्न असतो;[1] यशवंत पाठक यांच्या वरील विधानाचा आशय असा, की ललितगद्यांत " मी " चा आविष्कार विविध दिशांनी होतो. म्हणजे ललितगद्य हे " मी " च्या आविष्काराचे लेखन केंद्र मानले तर, भिन्न दिशांनी विविध अनुभवांचे जे प्रक्षेपण होईल, त्याचे लेखन-स्वरूप भिन्न भिन्न राहील. उदा॰ 'स्थळ' विषयक अनुभव, रमणीय

स्मृतीबाबतचा अनुभव, मुंबई ते गोवा प्रवासाचा अनुभव, एखाद्या व्यक्तीचा मनावर उमटलेल्या ठशाचा अनुभव, ज्ञानेश्वर दारुच्या गुत्त्यावर आढळतात तेव्हाचा चमत्कृतीजनक अनुभव इ. इ. या सर्व अनुभवांत " मी " आहे. त्याच्या अनुभवाचे शब्दबध्द रूप मात्र भिन्न राहते. याचाच अर्थ असा कीइये लेखनाची "प्रकारजाणीव " निर्माण होते.

विषयानुरूप प्रकार :

ललित साहित्य ही एक सर्वसमावेशक अशी वाङ्‌मयीन संज्ञा आहे. याचे क्षेत्र एवढे व्यापक दिसते की नेमकेपणाने व्याख्याकरणेच कठीण ठरावे. या संदर्भात शुभदा शेळके म्हणतात - "सर्वसाधारणपणे जे कोणत्याही विवक्षित वाङ्‌मयप्रकारांत न मोडता, जीवनानुभव आणि तदनुषंगिक चिंतनपरता व्यक्त करते ते ते सारे कांही ललित वाङ्‌मयात मोडते असे म्हणायला हरकत नसावी. मग तो मानसपातळीवरील आध्यात्मिक अनुभव असो वा वृत्तपत्रीय रिपोर्टाज " पध्दतीने व्यक्त झालेला वास्तव पातळीवरील अनुभव असो. निसर्गाशी एकरूप होतांना आलेला वास्तव क्षण असो किंवा प्रत्यक्ष एखाद्या व्यक्तीची वस्तुनिष्ठ भूमिकेतून घेतलेली मुलाखत असो" [2] म्हणजे श्रीमती शेळके यांच्या मते त्यांच्याच शब्दांत " विवेचनाच्या सोयीसाठी या लेखनाचे आत्मपर, वास्तवपर, निसर्गपर, आणि प्रवासवर्णनपर असे प्रकार करता येतील. अर्थातच हे कांही काटेकोरपणे केलेले कप्पाबंद वर्गीकरण नव्हे. साधारणतः ते विषयानुरूप, आशयानुरूपच ठरवावे लागेल" [3]

कोणत्याही वाङ्‌मयप्रकारांत न मोडताही जे जीवनानुभव प्रकट करते, ते सारे लेखन श्रीमती शेळके यांच्या मते ललितलेखनांत मोडते. सोईसाठी त्याचे कांही प्रकार करतां येतात असे त्यांचे म्हणणे . पुढे त्या

असेही म्हणतात की हे वर्गीकरण कप्पाबंद नव्हे. निष्कर्ष हा॰या लेखनाचे खूप प्रकार होतात. त्यां प्रकारांची सरमिसळ होऊ शकते. यशवंत पाठक, शुभदा शेळके वगैरे नव्या नामावलीत बसणारे श्री. विजय पाडळकर म्हणतात - " ललित लेखन हा एक अत्यंत फसवा साहित्य प्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक वगैरे इतर साहित्यप्रकारांप्रमाणे ह्या लेखनाची विशिष्ट व्याख्या करतां येत नाही. शिवाय वैचारिक गद्य या नांवाचा एक वेगळा सवतासुभा काढून त्यावर अलग विचार केला जात असल्यामुळे ललितगद्य म्हणजे अ"-वैचारिक गद्यलेखन " असा वाचकांचा व लेखकांचाही समज झालेला आहे."[४] ललितगद्याचे काटेकोर निकष ठरवता येत नसल्यामुळे आणि त्यातील आत्मनिष्ठेचा आविष्कार विविध स्वरूपी आणि विविध पातळ्यावरून असल्यामुळे, श्री. पाडळकर यांना ललित लेखन हा फसवा साहित्यप्रकार वाटतो. शिवाय ललित गद्याची व्याख्या करता येत नाही ही त्यांची वेगळी तक्रार आहेच. श्री. बेंडखळेही अनेक उपप्रकार सांगतात."[५]

## ललितगद्य " शिराळशेटी मायपोट "

वर ज्यांचा विचार केला ते ताज्या दमाचे नवे समीक्षक, एक जुने, जाणते समीक्षक प्रा. भीमराव कुलकर्णी लिहितात " " एक कालखंड असा होता, की त्या वेळी मराठी वाङ्‌मयाचा आढावा घेतांना " लघुनिबंध " या वाङ्‌मयप्रकाराचा समावेश त्यामध्ये स्वतंत्र-पणे करणे अत्यावश्यक असे परंतु गेल्या पाच सहा वर्षांत ही आवश्यकता कमी होत गेली आणि " संकीर्ण ललित गद्य " असे ऐसपैस नांव देऊन कथा, कादंबरी, नाटक, चरित्रे-आत्मचरित्रे व कविता इत्यादी वाङ्‌मय-प्रकारात न बसणाऱ्या वाङ्‌मयाचा समावेश या प्रकारात करण्यात येऊ लागला. " ललित गद्य" हे एक प्रकारे या रीतीने लघुनिबंध,

ललितनिबंध, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे, भावचित्रे, प्रवासवर्णने, विनोदी लेखन आत्मनिष्ठापर वैचारिक लेखन इ. प्रकारांना सामावून घेणारे वाङ्‌मयाचे " शिराळशेटी मायपोट"च ठरले आहे."[६] कुलकर्णी यांच्या मते " ललित गद्य " म्हणजे शिराळशेटचे थोराड पोट ज्यांत कांहीही भरता, कोंबता येते.

## विशेषांच्या आधारे उपप्रकारांचे व्यवस्थापन

वरील विवेचनाचा निष्कर्ष हा आहे, की ललित गद्याच्या उपप्रकारांची संख्या नेमकी किती हे निश्चित करणे आवश्यक आहे. आज अवस्था अशी आहे, की वैचारिक गद्य व्यतिरिक्त ( म्हणजे निबंधवाङ्‌मय ) इतर सारे(म्हणजे रिपोर्ताज सुद्धा) गद्यलेखन " ललित-गद्य या सदरांत ढकलले जात आहे. मराठीत विनोदी लेखनाची परंपरा असूनही, विनोदी वाङ्‌मयाचा स्वतंत्र प्रकार असूनही कांही विनोदी लेखन " ललित गद्य" म्हणून संबोधले जाते. चरित्र-आत्मचरित्र वाङ्‌मयाचाही खास स्वतंत्र प्रकार आहे. असे असतानाही कांही आत्मचरित्रांचा
[6] "ललित आत्मचरित्रे " म्हणून ललित गद्यात समावेश केला जातो. साहित्याचे प्रकार हे साहित्याच्या " व्यवस्थापन " या संकल्पनेतून जन्माला आलेले आहेत. तेव्हा " ललित गद्य " या सदराखाली येणाऱ्या लेखनाचे उपप्रकार निश्चित केले, की वाङ्‌मय व्यवहारांतील प्रकार" मतभेद कमी होतील. ललित गद्याचे निश्चित असे स्वरूप आहे, त्याचे म्हणून खास " विशेष " आहेत.त्यांच्या आधारे हे उपप्रकार निश्चित करता येतील. एक अत्यंत सामान्यसूत्र म्हणजे " आत्मनिष्ठा". या सूत्राची, या सूत्राधिष्ठित वाङ्‌मयाची ओळख आपल्याला इंग्रजीच्या अभ्यासानेच झाली. म्हणूनच निबंधवाङ्‌मयाला लघुनिबंधाचा ललित स्पर्श झाला. त्यांतूनच ललितनिबंध विकसित झाला. लघुनिबंध, ललितनिबंध, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्र आणि

आठवणीवर आधारित लेखन या सर्वांची प्रेरणा आपल्याला इंग्रजीतच शोधावी लागते. लेखनाला आत्मनिष्ठेचा परिस्पर्श झाला, की ते लेखन किती सौंदर्यसंपन्न होते, किती भावगर्भ होते, भाषेला केवढा मोहकपणा लाभतो हे स्वातंत्र्योत्तर कालांतील ललितलेखन अभ्यासताना सहज कळून येते. त्याच्या जोडीस अन्य विशेषांची कसोटी !

तेव्हा लघुनिबंध ललितनिबंध, आठवणी, प्रवासवर्णन आणि व्यक्तिचित्रे हेच, ललित गद्य " ही व्यापक संज्ञा ज्या पुरुष मुख्यप्रकाराला दिली जाते त्याचे, उपप्रकार समजून मराठीतील ललित गद्याची वाटचाल पाहणे श्रेयस्कर ठरेल., आणि ही वाटचाल , वळणे आणि वळणांच्या शिल्पकारांच्या नोंदीची असेल !

अ. लघुनिबंध / फडके यांची कलात्मकता"

ललित वाङ्मयातील बोधाच्या गुप्त पोलिसा"ला ना. सी. फडके यांनी पिटाळून लावले. आणि १९२५ च्या सुमारास त्यांनी मराठी निबंध वाङ्मयाला एक नवा " उपहार" दिला. " माझ्या साहित्यसेवेतील स्मृती"त ते लिहितात - " चेस्टरला, गार्डिनर, लिंड इत्यादीचे निबंध वाचले की, माझ्या मनांत येई की, असे मराठीत कां लिहिले जाऊ नयेत ?..... मनाशी निश्चय केला की, ( इंग्रजी ) निबंधाची ही मोहक त-हा आपण मराठीत आणावयाची ! १९२५ च्या नोव्हेंबर महिन्यांत मी माझी पहिली गुंजगोष्ट " सुहास्य" लिहिली." म्हणजे मराठीतील लघुनिबंधाचे जनक प्रा. ना. सी. फडके हेच होत. " गुजगोष्ट " ला पर्यायी नांवे लघुनिबंध, ललितनिबंध ही त्यानीच वापरलेली आहेत. थोडक्यात " गुजगोष्ट " म्हणजे मराठीतील Personal Essay नंतर अनेक प्रतिथयश लेखकांनी लघुनिबंध हा नवा निबंधप्रकार चांगला हाताळला, नावारुपाला आणला.

12715

A

" गुजगोष्टी " ( १९३३ ), " नव्या गुजगोष्टी " ( १९३७), व " धूम्रवलये " ( १९४१ ), इ० संग्रहातून फडक्यांचे लघुनिबंध वाचावयास मिळतात. हे लघुनिबंध अत्यंत चटकदार व रंजक आहेत. मोहक लालित्यपूर्ण आणि नटवी भाषा, दुर्लक्षित विषय व विषयाची खुलावट, अधून-मधून आठवणींची पेरणी, या सर्वांची कलात्मक गुंफण आणि लक्षवेधी शेवट हे फडक्यांचे लघुनिबंध विशेष म्हणून नोंदता येतील. त्यांच्या एकूण गुजगोष्टींचा " चमत्कृति" हा आत्मा आहे. फडक्यांच्या मते " चमत्कृति" हा विशेष लेखनगुण आहे, त्याचे प्रत्यंतर हे लघुनिबंध घडवतात. फडक्यांच्या " कलात्मक व्यक्तिमत्वाचे"(नृत्य, नाट्य, संगीत क्रीडा ) दर्शनही घडते.

## खांडेकरांचे जीवनानुभव

वि. स. खांडेकर यांनी लघुनिबंधाला एक वेगळेच वैभव प्राप्त करून दिले. विशाल कल्पकता आणि मनाची भावनाशील तळमळ यामुळे खांडेकरांच्या लघुनिबंधाना उत्कटता लाभते. त्यांच्या लघुनिबंधाची घडण जीवनानुभवावर झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या शैलीत बांधीवपणा, नीटसपणा, नसला तरी एक प्रकारचा जिव्हाळा आहे. यामुळे फडके यांच्या लघुनिबंधाहून खांडेकरांचे लघुनिबंध वेगळे पडतात. खांडेकर " चमत्कृति"पेक्षा " जिव्हाळा" अधिक मानतात०या जिव्हाळयामुळे खांडेकरांच्या लघुनिबंधाना "सामाजिकते"ची बैठक लाभते, खांडेकरांचा लघुनिबंध वाचकांच्या जवळ सरकतो. समाजपरिवर्तन आणि समाजाचे यथार्थ दर्शन हे खांडेकरांच्या एकूण वाङ्‌मयाचा स्थायीभाव आहे, तो लघुनिबंधातही पहायला मिळतो. त्यांच्या लेखनशैलीबद्दल प्रा. वि. बा. आंबे कर लिहितात - " चमत्कृतिपूर्ण कल्पनांना, संदर्भांना, पौराणिक आणि ऐतिहासिक उल्लेखांना आणि वाङ्‌मयातील अवतरणांना व संकेताना झपाट्याने आकर्षक कलाटणी देऊन वर्ण्य विषयाचे तेज वाढविण्याचे त्यांचे सामर्थ्य लघुनिबंधलेखनाच्या कलेला फार सहाय्यक झाले आहे."[७]

खांडेकराच्या लघुनिबंधात " जीवनावरील नितांत श्रध्दा, मांगल्याचा निदिध्यास, उदात्त जीवनमूल्यांची उपासना, मानवतावादी दृष्टिकोन या सर्वांचे दर्शन वाचकाला घडते " असे प्रा. वि. पां. देऊळगांवकर व डॉ. चंद्रकांत देऊळगावकर नोंदवतात. [८] आशयाच्या दृष्टीने समृद्ध जीवनानुभव आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विशाल कल्पकता, भाषेतील अलंकार प्राचुर्य, आणि सुभाषित वापर यामुळे खांडेकरांचे लघुनिबंध हे विकासाच्या दृष्टिने पुढील पाऊल म्हणावे लागेल. " वायुलहरी " ( १९३६), " चांदण्यात " ( १९३८), सायंकाल ( १९३९), अविनाश ( १९४१ ), मंजि-या ( १९४४) व कल्पलता ( १९४५), इ. खांडेकरांचे लघुनिबंधसंग्रह होत.

## काणेकरांची वैचारिक प्रक्रिया

फडके-खांडेकरांच्या पठडीतील वि. ल. बर्वे यांच्या " पिसारा " लघुनिबंध संग्रहानंतर लघुनिबंधाची कोंडी अनंत काणेकरांनीच प्रथम फोडली. काणेकरांचा लघुनिबंध फडके, खांडेकर यांच्याच मार्गावरुन जात होता. पण त्यांत पूर्वीची कारागिरी किंवा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसून येत नाहीत. काणेकरांनी आपल्या लघुनिबंधात आशयाला महत्व दिले, आणि " तर्ककर्कश विचारप्रधानता " हे त्यांच्या लघुनिबंधाचे वैशिष्टय बनले. काणेकरांच्या लघुनिबंधाची सुरुवात - मध्य - अखेर ही सर्व विचारप्रधानतेवर आधारलेली. व्यवहारांत एखादी घटना घडते, त्या घटनेवरुन एखाद्या शाश्वत मूल्याचा विषय निघतो, पूर्वापार सनातनीपणाची बाजू घेणारे गणूकाका आपली मूल्ये-मते ठासून मांडतात, आणि या मताची काणेकर रेवडी उडवितात. संपला काणेकरांचा लघुनिबंध ! थोडक्यात काणेकरांच्या लघुनिबंध हेतू, तंत्र या दृष्टीने विचारप्रधान असतो. त्यांच्या लघुनिबंधाची नांवे ही सुध्दा " साम्य-विरोध " या वैचारिक प्रक्रियेने युक्त असतात. वैचारिक प्रक्रियेला लालित्य केव्हा येते ? यांचे उत्तर गंगाधर गाडगीळ देतात " " ते नुसते विचार मांडीत नाहीत, तर विचार करण्याचा

आपला समग्रच अनुभवच वाचकांपुढे ठेवतात. त्यामुळे वाचकांना नुसता विचार प्रतीत होत नाही, तर स्वत: विचार करण्यातली जी मौज असते, त्यातले जे थ्रिल " असते तेदेखील त्यांना प्रतीत होते... काणेकरांची भाषा ही त्यांच्या लघुनिबंधाच्या स्वरूपाला साजेशीच आहे . सोपी, सुटसुटीत, धारदार, रोकड रक्कम हातात ठेवावी तसा अर्थ व्यक्त करणारी. नटण्यामुरडण्याचा तिला तिटकारा आहे. आणि तरी ती प्रसन्न आणि ऐटबाज आहे...काणेकरांच्या लघुनिबंधाची शीर्षके आणि शेवट मोठे धारदार ( telling )आणि आकर्षक असतात, हीदेखील लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे"[१] " पिकली पाने" " शिंपले आणि मोती, " तुटलेले तारे " उघड्या खिडक्या" प्रकाशाची दारे " आणि " काळे आणि पांढरे इ. काणेकरांचे मान्यताप्राप्त लघुनिबंधसंग्रह होत.

लघुनिबंधाची चौकटमोड

फडके, खांडेकर आणि काणेकर ही तीन नांवे म्हणजे लघुनिबंध क्षेत्रांतील " शिखरे." पण अनेकांनी हा ललित गद्य प्रकार विकसित करण्यास हातभार लावलेला आहे. र. गो. सरदेसाई, गं. भा. निरंतर मा. का. देशपांडे, गो. रा. दोडके, श्री. स. भावे, रघुवीर सामंत, वा. भा. पाठक, वि. द. साळगांवकर, द. दा. पेंडसे, यशवंत, ना. मा. संत, वि. पां. दांडेकर आणि कुसुमावती देशपांडे इ. अनेकांनी हा निबंधप्रकार हाताळला आहे. ही यादी खूप वाढवता येते. उपरोक्त यादीतील उल्लेखनीय नांव म्हणजे कुसुमावती देशपांडे ! कुसुमावती देशपांडे यांचा मूळ पिंड वाङ्‌मयाभ्यासक किंवा समीक्षक याचा . पण याची सावली त्यांच्या लघुनिबंधावर पडलेली नाही. " मध्यान्ह " " मध्यरात्र"

आणि " चंद्रास्त " हे तीनच लघुनिबंध कुसुमावतींनी लिहिलेले आहेत. पण संख्येपेक्षा त्यांची गुणवत्ता मोलाची आहे. लघुनिबंधाचा साचा बनलेल्या काळांतील हे तीन लघुनिबंध, कुसुमावतींच्या लेखनाची वेगळी झलक दाखवितात. या तीनही निबंधांत नैसर्गिक स्थळांतरांचे त्यांनी कलावंत नजरेने चित्रण केले आहे. त्यांचे मन निसर्गाशी संवाद साधते. कुसुमावतींच्या लघुनिबंधाबद्दल रजनी कोलारकर लिहितात - " या तीनही निबंधातून वाङ्‌मयीन हृद्य आठवणी त्यांच्या प्रखर बुध्दिमतेचा भाग म्हणून येतात... कुसुमावतींचे निबंध काव्यात्म, उत्कट आणि भावकोमल आहेत, तसेच ते भरीव आणि खोल आहेत. त्यातून त्यांच्या अभिजात रसिकतेची साक्ष पटते. त्यांतील विदग्धता वाचकांना संमोहित करते... अखेरीस वाचकांच्या दीर्घकाल स्मरणांत राहतो, तो मानवी जीवनांतील उदात्ततेचा, चिरंतन सत्याचा त्यानी घेतलेला शोध"[१०] एकूण काव्यात्मता आणि चिंतनशील वृत्ती यांचे बेमालूम मिश्रण कुसुमावतींच्या लेखनांत आढळते. म्हणूनच त्या इरावतीकर्वे व दुर्गा भागवत यांच्या पूर्वावतार ठरतात.

—जवळजवळ दोन तपे हा वाङ्‌मयप्रकार रसिकप्रिय राहिला पण १९४५ नंतर त्याला उतरती कळा लागली. झपाटयाने पूर यावा आणि ओसरावाही झपाटयाने, तसाच प्रकार झाला. अंगभूत वैशिष्टयांचा अतिरेक झाला आणि स्वाभाविकतेच्या ठिकाणी कृत्रिमता आली, उथळ रूप उघडे होऊ लागले. लघुनिबंध क्षीण का झाला याची कारणमीमांसा वि. स. खांडेकर यांनी केली आहे.[११] त्यांच्या मते तीन कारणे संभवतात. एक फडके, काणेकर यांच्या तोडीचा नवा लघुनिबंधकार दिसत नाही. दुसरे हौसेने, निष्ठेने लघुनिबंध लिहिणारे लेखक क्वचितच आढळतात. आणि तिसरे नव्या लघुनिबंधकाराला कालानुरूप नवे प्रयोग करता येत नाहीत. यांतील तिसरे कारणच अधिक महत्त्वाचे आहे. ज्या जिद्दीने, ज्या तडफेने, ज्या आत्मविश्वासाने ना. सी. फडके यांनी हा वाङ्‌मयप्रकार जोपासला, ती जिद्द, तडफ, आत्मविश्वास, पुढीलांच्यात राहिली नाही. ते फक्त साचा गिरवत राहिले, तंत्राची चौकट

त्यांना मोडता आली नाही. ही चौकट मोडली इरावती कर्वे बाईंनी, आणि लघुनिबंध विकासला ।.

## ब. ललितनिबंध /इरावतीबाईंची चिंतनशीलता

१९४७ च्या आगेमागे मराठी साहित्यांत विशेषत: वाङ्‌मय-प्रकारांच्या अंतरंगबहिरंगांत कांही बदल घडून येत होते. तंत्र, आशय आणि अभिव्यक्ती या संदर्भातील हे बदल वाङ्‌मयप्रकाराला नव चैतन्य प्राप्त करुन देत होते. ललित गद्यातील याचे दृश्यरूप म्हणजे इरावती बाईंचा ललितनिबंध, लघुनिबंध म्हणजे हलकाफुलका लेखनप्रकार ही दृष्टी इरावती बाईंच्या ललितनिबंधामुळे बदलली. इरावती बाईंच्या ललितनिबंधासंबंधी आनंद यादव लिहितात - " अनुभवांचे गुच्छत्व हा जुन्या लघुनिबंधाचा सांगाडा एवढाच त्यांनी स्वीकारला आणि बाकीचे तंत्र, आरंभ -शेवटाच्या उप-या जाणिवा, मोहक विषयांतराचा खटाटोप, संदेश सांगण्याचा दांभिक प्रेषितपणा झुगारुन दिला. खोटी शैलीदार भाषा कधीही स्वीकारली नाही. स्वत:चे मौलिक स्वरूपाचे कौटुंबिक, समाजशास्त्रीय, परदेशीय, जगभर व देशभर झालेल्या प्रवासातील वैचित्र्यपूर्ण, व्यापक सखोल अनुभव जोमदारपणे आविष्कृत केले. भाषाही तितकीच प्रांजळ, पारदर्शी, साधी ठेवली. सर्वांना हळूहळू चिंतनाची, विद्वतेची, विचारवंत मनाची वैशिष्ट्यपूर्ण पातळी लाभत गेली आणि जुन्या लघुनिबंधाने लक्षणीय वेगळे रूप धारण केले. जो आत बाहेर बदलून गेला,...ख-या अर्थाने वेगळे, अव्वल दर्जाचे व्यक्तिमत्व लागते हे त्यांच्या लघुनिबंधानी प्रथमच दाखवून दिले." [१२] म्हणजे यादवांच्या विवेचनानुसार ललितनिबंधाची सुरुवात इरावती बाईंच्या पासूनच करावी लागते आणि ते खरेही आहे. म्हणूनच ल. ग. जोग म्हणतात - " इरावतीबाईंच्या लेखनाचे, मला वाचक म्हणून अखंड अक्षीण आकर्षण आहे. " गंगाजल " हे केवळ ललित पुस्तक नव्हे, ते

ललित माध्यमातून केलेले मुलभूत चिंतन आहे. हायडेगर, युंग, बेन्थॅम, वेब, कामू, एक्झुरी इ. भिन्न भिन्न क्षेत्रातल्या व्यक्तींच्या विचारधनाने स झालेले तीक्ष्णावेधक व्यक्तिमत्व वाचकाना निश्चितच आवडेल"[13]

इरावतीबाईंची भाषा पण आशय-लीन दिसते. वाचकाला मंत्रमुग्ध करावे, इकडे तिचा रोख नसतो. तिच्यात वाङ्‌मयीन दिमाख नाही. आशय कवेत घेण्याचे सामर्थ्य मात्र हमखास आहे. परिपूर्ति ( १९४९), भोवरा ( १९६०), व " गंगाजल " ( १९७६), हे त्यांचे तीन ललितलेख संग्रह होत. थोडक्यात - " खेळकरपणाचा आव आणून किंवा कारागिरीचा शोभिवंतपणा निर्माण करून ठशकिमते मांडणे या चौकटीतून ललित निबंध प्रथम मुक्त केलेला दिसतो....असुंदराचे वास्तववादी पण रमणीय वर्णन ललित निबंधात प्रथम त्यानीच केलेले दिसते व मरणाचे केंद्र नीटपणे तपासण्याचे धाडसही दाखविलेले दिसते. कधी हा विषय संशोधनपर टिपण्णा-या जवळ जातो तर कधी त्याचे कांही भाग कवितेच्या जवळ जातात"[14] असे जे मूल्यमापन इरावतीबाईंच्या ललितलेखनाबद्दल नरहर कुरुंदकरांनी केलेले आहे, त्याशी कोणीही सहमत होईल, असे वाटते.

## दुर्गाबाईंची अंतर्मुख वृत्ती

ऋतुचक्र ( १९५६ ), भावमुद्रा ( १९६०), व्यासपर्व, (१९६२), रुपरंग, ( १९६७), आणि पैस ( १९७०), ही दुर्गा भागवतांची ललितगद्याची पांच पुस्तके होत. ललितलेख, प्रवासलेख, व्यक्तिरेखा, आठवणी आणि लघुनिबंध हे सर्व प्रकार या पाच पुस्तकांत आढळतात. "भावमुद्रे" तील लेख वाचतांना एक गोष्ट ठळकपणे जाणवते, जी बाईंच्या लेखनाचे वेगळेपणाही दर्शविते, ती म्हणजे तेथील सर्वच अनुभवांना कोठल्या तरी " भावा"चा स्पर्श झालेला आहे. हा स्पर्श केवळ अनुभवांनाच नाही तर तद्द्वारा निर्माण होणा-या चिंतनालाही त्यांचा स्पर्श लाभलेला आहे.

म्हणजे कुसुमावतींच्या लेखनाचे विकसित व समृध्द रूप म्हणजे दुर्गा भागवतांचे लेखन म्हटल्यास ते अतिशयोक्त ठरु नये. दुर्गाबाईंचे मन अतिशय संवेदनशील, त्या खूप निसर्गप्रेमी । त्यांच्या ललित-निबंधांतील भाववृत्तीबद्दल व निसर्गविश्वाबद्दल आनंद यादव लिहितात— " त्यांच्या लघुनिबंधात " मी " ची भाववृत्ती ही केंद्रस्थानी असते. म्हणून आपण ते वर्णन वाचत असतो. ते खरेखुरे वर्णन नसून त्या वर्णनाच्या निमित्ताने " मी " च्या भाववृत्तीचाच आविष्कार होत आहे असे जाणवते. वर्णन तेथे गौण स्थानी जाते. सबंध लघुनिबंध वाचल्यावर असे वाटते की ही भाववृत्तीच त्यांच्या लघुनिबंधाची प्रमुख प्रेरणा आहे.... या भाववृत्तीला जी चालना मिळते ती निसर्गाच्या सान्निध्यात० त्यांचे मन संवेदनाशील असले तरी निसर्गाच्या सानिध्यात त्यांच्या भाववृत्ती अधिकाधिक फुलून येतात. त्यामुळेच की काय त्यांच्या लघुनिबंधांत निसर्गविश्व सातत्याने आणि विपुलतेने अवतरतांना दिसते. लघुनिबंधाचा तो एक अपरिहार्य भाग होऊन बसलेला आहे" [15] यादवांच्या मते दुर्गाबाई निबंधाच्या आरंभापासूनच अंतर्मुख झालेल्या असतात. म्हणूनच तो जुन्या, स्थिर पध्दतीचा वाटत नाही. तो गतिमान आणि विकसित होत जाणारा वाटतो. " मी " चे सच्चे, अथांग, पसरलेले गुंतागुतीचे व्यक्तित्व त्यांच्या ललितनिबंधातून जाणवते. नेमके यादवांच्या उलट मत श्रीमती रजनी कोलारकर नोंदवतात - त्या म्हणतात, " अशीच बौध्दिकता, वैचारिकता, दुर्गाबाई भागवतांचेही लिखाण धारण करते० त्यांच्या " पैस" " भावमुद्रा " या संग्रहातून त्यांचा व्यासंग आणि वैचारिकता यांचा ठायीठायी प्रत्यय येतो.... त्यांच्या ऋतुचक्र " मध्ये ऋतूतील मुख्यत: रम्यताच त्या वाचकांना स्पष्ट करून दाखवितात... इथले ( म्हणजे " ऋतुचक्रांतले) ललितलेख शेवटी दुर्गाबाईंचे आत्माविष्कारी रूप घेऊच शकत नाहीत" [16] जेव्हा विचाराला भावस्पर्श होतो, तेव्हा तो विचार चिंतनरूप धारण करतो. हा फरक कोलारकर बाईंच्या ध्यानात न आल्यामुळे ऋतुचक्र मधील ललितलेखांना आत्माविष्कारी रूप प्राप्त झाले नाही असे त्या म्हणतात. दुर्गाबाईंच्या ललितलेखनांत शुध्द आणि म्हणून शुष्क वैचारिक आढळत नाही, तर तिथे ललितलेखकाची चिंतनशीलता आढळते. विचार हाच—

अनुभव बनलेला असतो. थोडक्यात दुर्गाबाईंनी जुन्या वाटेवरून जाण्याचे नाकारले. त्यांच्या ललितनिबंधाने 'स्वरूप' धारण केले. आत्मनिष्ठ अनुभव आणि अंतर्मुख वृत्तीने लेखन हे त्यांचे वैशिष्टय म्हणावे लागेल.

## करंदीकरांच्या विचारातील पौरूषपण

" जुन्या लघुनिबंधाला चाचपून पाहात, त्याची शक्तिस्थाने हेरून तो आत्मसात करून, त्यातील उप-या बाबींना नाकारत, लघुनिबंधाच्या प्रत्येक घटकांतील मूळ रूप शोधून, त्याचे मूळ प्रयोजन हेरून त्यांचा वापर करून, व नंतर स्वतंत्र विविध रूपे लघुनिबंधाला प्राप्त करून देणारा लघुनिबंधकार म्हणजे गो. वि. कारंदीकर. त्यांच्या लघुनिबंधामुळे जुना लघुनिबंध अंतर्बाह्य बदलून गेला व पुढे त्याला नवेच रूप प्राप्त झाले"[१७] उपरोक्त शब्दांत आनंद यादवानी ललित गद्याच्या क्षेत्रातील करंदीकरांचा यथोचित गौरव केला आहे. करंदीकरांचे व्यक्तिमत्व हे एका कवीचे व्यक्तिमत्व आहे. कवीचे व्यक्तिमत्व हे " संमिश्र, गहन आणि व्यापक " असते. करंदीकरांच्या ललित लेखांत ही संमिश्रता, गहनता आणि व्यापकता अगदी सहज, प्राकृतिक अशा स्वरूपांत प्रकट झालेली असते. मानवी जीवनांतील गुंतागुंत, माणसाच्या विशिष्ट वृत्ती, त्याचे विविध दृष्टिकोण आणि सामाजिक विसंगती यांचा प्रखर असा वेध घेतलेला, पहिल्यांदाच, आपल्याला करंदीकरांच्या निबंधात दिसून येतो. सामाजिक विसंगती टिपताना करंदीकर तर्ककर्कश विचारप्रक्रियेचा स्वीकार करीत नाहीत. तर उपहास, सूचकता, नर्मविनोद आणि अतिशयोक्ती इत्यादींद्वारे आत्माविष्कार करीत, त्या सामाजिक विसंगतीवर, जीवनाच्या अनेक अंगोपांगावर ते प्रकाशझोत टाकतात. त्यांच्या लेखनांत 'विचार " असतो, पण हा विचार केवळ विचारासाठी आलेला असतो, तर तो एक साक्षात 'विचारानुभव' असतो. हा विचारानुभव 'कवी व्यक्तिमत्वामुळे अभिव्यक्त होतांना

" ललित" होऊन अभिव्यक्त होतो. संवेदना, भावना आणि कल्पना यांची पुटे त्याला चढलेली असतात. विचारांना गोंडस, डौलदार मोहक रूप देतांना साहजिकच फडके, खांडेकर यांच्या विचारांना बाह्य देखणेपणा आला, पण विचारांना जो अंगभूत पौरुषपणा ( Mascu- larity ) असतो, तो मात्र हरवला गेला. करंदीकर हे विचाराला थेट ( Directly ) भिडतात. चिंतनाच्या स्पर्शाने तो विचार "विचारानुभव" बनून ललित होतो. त्यांचे ललितनिबंध सरळपणे तत्व-चिंतन करु लागतात. अशावेळी ते प्रतिमांची मुक्त उधळण करतात. सुरुवात - मध्य - अखेर या क्रमाने त्यांचे लेखन होत नाही. त्यांची रचना वक्र वाटते. त्यामुळे त्यांचा ललितलेखन साधा, आटोपशीर, सरळ न होता कमालीचा गुंतागुंतीचा, काव्यात्म असा घाट त्याला लाभलेला असतो. ललितलेखनाचे खरे सामर्थ्य करंदीकरांनाच जाणवले. हे समर्थपणे " स्पर्शाची पालवी " व " आकाशाचा अर्थ " मध्ये प्रकट झाले.

## ग्रामीण आणि नागर अनुभवांचा आविष्कार

निसर्गाच्या साध्या वर्णनांतूनही अमाप प्रतिमांची मुक्त उधळण करणाऱ्या मंगेश पाडगांवकरांचा " निंबोणीच्या झाडामागे" हा लघुनिबंध संग्रह १९५६ साली प्रसिध्द झाला. याच सुमारास " प्राणहिता" या टोपण नावाखाली " सत्यकथेत " प्रसिध्द होणारे ललितगद्य वाचकांचे लक्ष वेधून घेत होते. प्राणहिता म्हणजे उषा मोहनी व प्रभा हातवळणे या दोघी बहिणी. ललितगद्याचे निखळ आत्मविष्कारी रूप त्यांच्या लेखनांत दिसते. एका प्रांजळ मनपचा अकृत्रिम आविष्कार त्यांत पहायला मिळतो. प्रामुख्याने बालपणाचे व महाविद्यालयीन जीवनातील अनुभवविश्व हे लेखीकेच्या लेखनाचे विषय झालेले आहेत. हे अनुभव तिने निखळपणे पकडते आहेत., आणि संवेदनेच्या पातळीवर अभिव्यक्त केले आहेत.

माधव आचवलांचे " किमया" हे पुस्तक १९६१ साली प्रसिध्द झाले. आचवल हे वास्तुकलाशास्त्रांतील एक तज्ञ असामी " किमया " मधील लेखांचे

आशयविश्व वास्तुकला, शिल्पकला आणि चित्रकला हे आहे. हे आशयविश्व संवेदनेच्या पातळीवर अभिव्यक्त झाले आहे आचवलांचे मन तीव्र अतीव संवेदनशील आणि काव्यात्म आहे. वास्तुकलासंबंधी सौंदर्यात्म अनुभव ते या लेखांतून प्रकट करतात. आचवलांची रसिकता, वृत्तीची उत्कटता व संवेदनशीलता याचा पानोपानी प्रत्यय येतो. त्यांच्या कल्पकतेचे कौतुक वाटते. आचवल संवेदना" या घटकाला प्राधान्य देतात. तथापि ते संवेदनांचा शोध " वास्तुशास्त्राच्या चष्म्यातूनच करतात. त्यांचे संवेदनांच्या आहारी जाणे जाणवते त्यामुळे त्यांच्या लेखांना पसरट-पणा येतो.

श्रीनिवास वि. कुलकर्णी यांचा " डोह " हा १९६५ साली प्रसिध्द झाला " डोह "मधील " लेखन इतकी विविध रुपे घेते, की त्याचे अमुक एका वाङ्.मयप्रकारांत वर्गीकरण करणे कठीण आहे. ते एकाच वेळी ललित निबंध, आत्मचरित्र, आठवणी स्मरणे , चिंतन, स्थलवर्णन अशी अनेक रुपे घेते आणि कुठल्याही एका प्रकाराला व्यापून पुन्हा जणू ते दशांगुळे उरते।"[१८] असे डॉ. प्रल्हाद वडेर " डोह "च्या ललितगद्याबद्दल म्हणतात. पण एकूण लेखन पाहता, या लेखनाचे स्वरुप स्मरणावर अधिष्ठित आत्मविष्का-राचेच आहे असे म्हणावे लागेल.

१९६५ पर्यंतचा मराठीतील बहुतांशी ललितनिबंध हा शहरी जीवनां-तील नागर अनुभवा भोवतीचा फिरत होता. नागर जीवनाच्या पलिकडे जे वि[illegible]त असे ग्रामजीवन आहे, त्या ग्रामजीवनातील अनुभवाकडे या नागर ललितनिबंधकाराचे लक्ष गेलेच नाही राजधानी किंवा प्रतिठित शहरांतील नियतकालिकांतून प्रसिध्द होणा-या ललितनिबंधाला एकप्रकारचा साचेबंदपणा आला. हा नागरनिबंध अनुभव, भाषा आणि लालित्य या दृष्टीने " समृध्द" झाला. पण " सर्वस्पर्शी " झाला नाही. कारण ग्रामसंस्कृतीपासून हे लेखन दूर राहिले. म्हणून ग्रामसंस्कृतीतील सकस आणि संपन्न अनुभवावर ज्यांनी आपल्या ललितनिबंधाची उभारणी केली असे कांही जे तुरळक लेखक महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतून पुढे आले, त्यापैकी श्रीनिवास वि. कुलकर्णी हे एक होत. पुढच्या कालखंडातील ग्रामीण ललितलेखनाची भक्कम

पायाभरणी कुलकर्णी आणि मधुकर केचे यांनी केली असे म्हणायला हरकत नाही. ( कुदळ मारून पाया काढणा-यांचा आढावा पुढे येईल ) कुलकर्णी, केचे यांच्या लेखनात " ग्रामजीवन" "ललितरू" धारण करते. " डोह " मध्ये माणसे, पशु, पक्षी आणि निसर्ग या सर्वांनाच " डोहा"ची पार्श्वभूमी लाभलेली आहे. दादा, थोरली आई, आई, वानरे, सुसरी, गिधाडे, वटवाघळे, ऊन, वारा, घुबडे आणि पाणी यांना स्थान असले, तरी लेखकाचे बालजग हेच " डोह"चे मध्यवर्ती केंद्र आहे. लेखक एकाचवेळी भूतकाळ आणि वर्तमानकाळ या दोन पातळयावर वावरतो. विविध अनुभवांचा अविष्कार या लेखांमधून होतो. कडू, गोड, सुंदर, भीषण, अद्भुत रूपे, अनुभव या लेखनांतून प्रकट होऊन, एक नितळ आरसस्थानी आणि मोहक अशा सौंदर्यविश्वाचे दर्शन घडवितात. याला कारण म्हणजे कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्व. त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल व अनुभवविश्वाबद्दल डॉ. आनंद यादव लिहितात - " डोह " मधील श्रीनिवास कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्व तीव्र संवेदनशील आहे. त्यामुळे या लेखनांत सर्वत्र काव्यात्मता आलेली आहे. त्यांच्या स्वभावामुळेच ते अनुभव प्रतिमांनी मुक्त अशा स्वरूपांत घेतांना दिसतात. ...... त्यामुळे अनुभवांना समूर्तता, सघनता, सूचकता प्राप्त होते. त्यांना विविध भावावस्था प्राप्त होतात. ते अनुभवही शुध्द आणि निखळ स्वरूपात व्यक्त करतात." १९ " डोह " चा आस्वाद हा आनंद योग आहे.

" सोन्याचा पिंपळ " हे श्रीनिवास कुलकर्णी यांचे दुसरे पुस्तक १९७५ साली प्रसिध्द झाले. " डोह " मध्ये कुलकर्णी यांच्या बालमनावरील निसर्ग, धर्म, हिंदुसंस्कार, पूर्वजन्म, मानवसृष्टी इ. बदल जे कुतूहल उभे होते, त्याचाच प्रौढपणीचा आविष्कार "सोन्याचा पिंपळ" मधील लेखांत दिसून येतो. आनंद यादवांच्या मते सोन्याचा पिंपळ " मध्ये एका हिंदू तीव्र-बालमनाची संवेदना प्रकट झाली आहे. या संवेदनेच्या पातळीवर वाचक कितपत पोचेल याबद्दल मात्र साशंकता आहे.

" बालकवींच्या प्रतिभेने कविता न लिहिता जर गद्य लिहिले असते, तर ते लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांचेच लेखन झाले असते, असे मला अनेकदा वाटले आहे"[20] असे ज्या ललितग्रंथाबद्दल मंगेश पाडगांवकर लिहितात, तो " पाण्याचे पंख " हा तिसरा ललित लेखसंग्रह १९८७ ला प्रसिध्द झाला. सूक्ष्मातिसूक्ष्म अनुभव आणि संवेदनशीलता हे कुलकर्णी यांचे दोन्ही गुण या पुस्तकातही दिसून येतात. तरल इंद्रियसंवेदनांचा उत्कट आणि सहजाविष्कार हे या लेखनाचे विशेष । समजूतदार, अकृत्रिम लेखन, भाषेची कोवळीक आणि काव्यात्मता यामुळे या लेखनाचा धागा पुन्हा " डोह "-शी जोडता येतो.

" मधुकर केचे यांचे " आखर - अंगण" हे आठवणी आणि अनुभव दर्शविणारे पुस्तक १९६७ साली प्रसिध्द झाले. केच्यांचे अनुभव विश्व ग्रामजीवनाचे आहे. " आखर-अंगण" मध्ये त्यांनी व-हाडी ग्रामजीवनांतील ललित अनुभव व्यक्त केले आहेत. हे " मी " चे अनुभव मुक्तपणे आविष्कृत झालेले आहेत. " मी " ने बालपणी पाहिलेली, भोगलेली स्थळे, वस्तू, व्यक्ति आणि घटना यातील लेखांचा विषय आहे. या वस्तू व्यक्ती आणि स्थळांत लेखक पूर्णपणे रमलेला आहे. सर्व लेखांवर गतायुष्यातील आठवणींची दाट छाया आहे.

केचे यांचे व्यक्तिमत्व कवीचे. मराठीत अनेक कवींनी ललित लेखन केलेले आहे. पाडगांवकर, कुसुमाग्रज, करंदीकर, शांता शेळके आणि मेश्राम इ. तथापि मेश्राम वगळता इतर सर्वांनी नागर ललितलेखन केले आहे.

ग्रामीण ललित लेखनात प्रादेशिक भाषेचा वापर अपरिहार्य असतो. केचे यांनी व-हाडी बोलीचा वापर केलेला आहे. तथापि व-हाडी बोलीचा वापर केलेला असला, तरी त्या ग्रामजीवनांतून व्यक्त होणारा अनुभव सगळीकडे "साधारण"च (Universal) आहे. या अनुभवाशी - प्रदेश, लोकजीवन, संस्कृती आणि जीवनव्यवहार यांनी संपन्न अशा अनुभवाशी -

संवाद साधायला वाचकाला व-हाडी बोलीमुळे कांहीच अडचण पडत नाही, उलट या बोलीच्या

वापरामुळे या लेखनाला ठसकेबाजपणा आलेला आहे. केचे व्यक्तिशः मिस्किलवादी आहेत. आखर-अंगण मध्ये त्याचा चांगला प्रत्यय येतो. तथापि निबंधकार केचेपासून कवी केचे लांब अंतरावर आहेत., हे सतत जाणवत राहते. नावीन्यपूर्ण आणि सर्वस्पर्शी अनुभवांची रेलचेल असूनही हे लेखन अखेर " कोरडे " असल्याचा प्रत्यय येऊ लागतो. उत्कटताही सर्वत्र समप्रमाणांत आढळत नाही. अनुभवांतील विविधतेला रुक्षतेचे गालबोट लागले नसते तर बरे झाले असते, असे सतत वाटत राहते. कांही का असेना ग्रामजीवनांतील विविध अनुभवांना ललितनिबंधात केचे यानी प्रतिष्ठा मिळवून दिली, हे मात्र वास्तव सत्य आहे.

" म. टाइम्स" मध्ये विजय तेंडुलकरांनी " कोवळी उन्हे" या नावाचे सदर चालवले होते. हे सदर लोकप्रिय झाले होते. या लेखनातून तेंडुलकरांनी मुंबईच्या महानग सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे विविधतापूर्ण वर्तमानवास्तव ललितगद्याच्या भूमिकेतून टिपले. या लेखनांत नाट्यपूर्णता, काव्यात्मता, हळुवारपणा, वैचित्र्य, इ. विविध आशयगुण प्राप्त झाले आहेत. तेंडुलकरांचे सहृदय व्यक्तिमत्व, नाट्यात्म मांडणी, आटोपशीर चटकदार कथन इ. गुणामुळे तेंडुलकरांचे हे लेखन ठसा उमटवणारे आहे. " कोवळी उन्हे " या सदरांतील हे लेखन 'कोवळी उन्हे' या ग्रंथनामाने १९७१ ला प्रसिध्द झाले.

याच दरम्यान व्यंकटेश माडगूळकरांचे " पांढ-यावरील काळे " हे पुस्तक प्रसिध्द झाले. भोवतालचे प्राणीजीवन, मानवाचे कुटुंबजीवन स्वतः लेखकाचे समाजजीवन यांचे फुटकळ अनुभव या पुस्तकांत एकत्र झालेले आहेत. प्रसन्नपणे केलेले तटस्थ पण वस्तुनिष्ठ निवेदन हे या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणावे लागेल. पण अनुभवाशी खेळत, त्याशी रुंजी घालत, त्यांची अभिव्यक्ती करण्याची जी काव्यात्म वृत्ती असायला हवी, ती माडगूळकरांजवळ नसल्याचेच प्रकर्षाने जाणवते. कथाकाराचे गुण असले तरी ललित गद्यकाराची काव्यात्म आत्मनिष्ठा या पुस्तकात आणि पुढच्या " आरण्यके"

आणि " नागझिरा " या पुस्तकांतही कमीच दिसते. वस्तुनिष्ठ, वास्तव निसर्गचित्र ललितगद्याला पुरेसे होत नाही.

संस्कृत, ‐‐ वृत्तांच्या लयीने मराठी रसिकांना झुलविणाऱ्या कवी " ग्रेस"चे " चर्चबेल " हे लिलितनिबंधाचे पुस्तक १९७४ ला प्रसिध्द झाले. त्यांचाच " मितवा " हा संग्रह १९८७ ला प्रसिध्द झाला. मराठीत ललितनिबंध संग्रहाच्या ज्या शिखररांगाआहेत, त्यांत " चर्चबेल " आणि " मितवा " यांचा समावेश आहे असे डॅा. चंद्रकात वर्तक म्हणतात. " नव्या ललितनिबंधाची सर्व गुणवैशिष्टये या दोन्ही संग्रहांत आहेत. " चर्चबेल" मुळे एका दमांत ग्रेस ललितनिबंधकारांच्या पंक्तीत जाऊन बसले. " चर्चबेल-मध्ये आठवणी आहेत, व्यक्तिचित्रणे आहेत., हळुवारपणो टिपलेली, निसर्गाची स्पंदने आहेत. " आकांताचे देणे" व " डब्लू एस लांडारेची कविता " हे दोन लेख तर अप्रतिमच उतरले आहेत. हे सगळे लेखन सौंदर्याला लालित्याला सामोरे जाते. पण सामान्य वाचकाच्या दृष्टीने कांही गोष्टी नोंदता येतात. या लेखनांत आत्माविष्काराऐवजी अतिवैय्यक्तिकता येते. जागोजाग येणारे वाचनांतील संदर्भ सर्वपरिचित ठरत नाहीत. प्रतिमांचाही गैरवाजवी वापर दिसून येतो. असे असले तरीही मराठी ललितगद्याच्या वाटचालीत या दोन संग्रहांनी मोलाची लक्षणीय भर घातलेली आहे, हे निर्विवाद !

सरोजिनी वैद्यांचे "पहाटपाणी " हे लघुनिबंधाचे पुस्तक १९७५ साली प्रसिध्द झाले. आनंद यादवांच्या मते आस्वादलेल्या वाङ्मयकृती विषयीचे मुक्तचिंतन हे त्याचे आशयविश्व आहे. विविध साहित्यकृतींचा आस्वाद यांत आढळतोय वृत्ती आस्वादकाची असल्याने विवरण गतिमान आणि चट-कदार झाले आहे. संवेदनशीलता आणि " मी " च्या जीवनांतील अनुभवांचा स्पर्श या निबंधाना झाला आहे. त्यामुळेच "पहाटपाणी"ला लालित्य लाभले आहे.

मराठी साहित्यात विद्रोह आणि नकार ऊन वेगळा सवतासुभा मांडू पाहणाऱ्या दलित साहित्यातील प्र. ई. सोनकांबळे यांचे आठवणींचे पक्षी " ( १९७९ ), हे पहिले ललित गद्याचे पुस्तक मानले जाते. सोनकांबळे यांच्या गतायुष्यांतील अनेक चांगल्यावाईट आठवणी यांत आलेल्या आहेत. या आठवणीतून ग्रामीण भागातील गावकुसाबाहेरील पददलित जीवन " आ"वासून वाचकासमोर उभे राहते. केवळ अस्पृश्यतेचे अनुभव प्रखरपणे, भडकपणे रंगवून मांडण्याचा प्रयत्न यांत नाही. अभिनिवेशाचा कसलाहि वास या लेखनाला नसल्याने ते आपसूकच कलात्मक पातळीला पोचले आहे. माणूस म्हणून जगतांना जे जे भोगावे लागते, त्याचे दर्शन सोनकांबळे आठवणीतून घडवतात. हे लेखन ग्रामीण भाषेत होते. त्यांमुळे सहजता, प्रांजळपणा, निरभिवेशावृत्ती, वास्तवाचे सहज आकलन इ. गुण अकृत्रिमपणे या लेखनाला लाभलेले आहेत. त्यामुळेच हे लेखन हृद्य झाले आहे.

नव्या ललितनिबंधांतील एक देखणा आविष्कार म्हणून १९८६ साली प्रसिध्द झालेल्या शरच्चंद्र चिरमुले यांच्या " वास्तुपुरुष " यापुस्तकाकडे पाहिले जाते.

प्रवासवर्णनपर आणि व्यक्तिचित्रात्मक ललितगद्य

ललितगद्याच्या " विशेषां"च्या आधारे आपण त्यांच्या उपप्रकारांचा विचार मागे केलेला आहे. एथपर्यंत आपण लघुनिबंध, ललितनिबंध, आठवणी आणि स्मरणावर आधारित गद्याचा, विविध क्षेत्रातील अनुभवावरील ललितलेख - त्याचे स्वरुप, विकासातील वळणे आणि वळणावरील शिल्पकार यांचा आढावा घेतला. आता प्रवासवर्णन अणि व्यक्तिचित्र यांच्या वाटचालीवर ओझरता दृष्टिक्षेप टाकावयाचा आहे.

अ. प्रवासवर्णन

" प्रवासात घेतलेल्या किंवा आलेल्या अनुभवांचा आणि मनावर स्थळादी गोष्टींच्या झालेल्या संस्कारांचा स्मृतिरूपाने घेतलेला पुनशोधं शब्दरूपात सजीव करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे प्रवासवर्णन" असे प्रवासवर्णनाची व्याख्या करतां येईल. अनुभवांचा पुनः शोध आणि शब्दावाटे त्यांची पुनःनिर्मिती ही प्रक्रिया प्रवासवर्णनाला लालित्य प्राप्त करून देते. ह्या प्रक्रियेत प्रवासवर्णकाराच्या संवेदनशील मनाला अतिशय महत्त्व असते. " त्याच्या ( म्हणजे प्रवासवर्णनकाराच्या ) समग्र व्यक्तिमत्वालाच कौल लागतो. प्रवासवर्णनातल्या " मी " चे स्वरूप द्विविध होते. प्रवास करणारा " मी " व प्रवास लिहिणारा " मी " हे वेगळे होऊ लागतात, कारण लिहिणा-या " मी " ला प्रवास करणा-या " मी च्या अवस्थेत ( मानसिक ) जाऊन प्रवासाचे सस्कार अनुभवावे लागतात. प्रवासलेखनाच्या वेळी हे दोन " मी " एकरूप होऊन प्रवासवर्णनाला आत्मनिष्ठेची पातळी लाभते."[२१] असे जे डॉ. चंद्रकांत वर्तक म्हणतात ते खरेच आहे. प्रवासवर्णनांत स्थळवर्णनाला महत्व नसून, स्थळ कसे " भावले " याला महत्व आहे. प्रवासकाराचे व्यक्तिमत्व आणि स्थळाचे व्यक्तिमत्व ही दोन्ही व्यक्तिमत्वे प्रवासवर्णनात मिसळतात. त्यांचे अद्वैतच त्याला लालित्य प्राप्त करून देते. इंग्रजीतील बर्टनचे " सिटी ऑफ दि सेंटस " आणि आल्डस हक्सलेचे " जेस्टिंग पायलेट " ही याची उत्कृष्टउदाहरणे होत. गोडसे भटजी ह्यांच्या माझा प्रवास ( १९०७), ह्या प्रवासवर्णनापासून केळकरांचे सिमला वर्णन ( १९२४), काणेकरांचे " धुक्यांतून लाला ता-याकडे " ( १९४०), गाडगीळांचे "साता समुद्रापलिकडे " ( १९५९), पाध्यांचे " लोकोनामा" ( १९५९), मोकाशींचे 'अठरा लक्ष पावले" ( १९७१), पु. ल. देशपांडे यांची 'अपूर्वाई ( १९६३)," पूर्वरंग " ( १९६३ ), रा. भि. जोशींची 'वाटचाल' ( १९५३), 'मजलदरमजल' (१९६३), रवींद्र पिंग्याचे 'आनंदवन" आणि शांतिलाल भंडारी - यांचे " सी यू अगेन"

( १९८४ ), पर्यंतची सर्व पुस्तके मराठीतील ललितप्रवासवर्णने म्हणून मान्यताप्राप्त आहेत.

ब. व्यक्तिचित्र

व्यक्तिचित्रांतही प्रामुख्याने स्थान " मी " लाच आहे. कारण लेखकाला व्यक्ती जशी भावते, तशीच ती शब्दबध्द करणार, व्यक्तिचित्राचे दोन भाग पडतात. १. ख-याखु-या व्यक्तींची चित्रे. २. कल्पनेच्या पातळीवरुन रंगविलेली व्यक्तिचित्रे. पहिल्या प्रकारच्या व्यक्तिचित्रात " मी " ला खोटे कांही लिहिता येणार नाही. व्यक्तींच्या आयुष्यातील घटना प्रसंग बदलता येणार नाही. पण या घटनाप्रसंगांचा तो कलात्मक वापर करु शकतो. दुस-या प्रकारच्या व्यक्तिचित्रात स्वतः लेखक त्या व्यक्तिसंबंधी कांहीही कल्पित उभे करुं शकतो. इथेच " व्यक्तिचित्रात आणि व्यक्तिचित्रात्मक कथा " यांतील फरक स्पष्ट होतो. कथेमध्ये येणारा माणूस माणसासारखा असतो पण खरा माणूस नसतो. कल्पिताच्या पातळीवरचा असतो आणि त्याचे चित्रण कथाकार स्वतःला जसे वाटते तसेच करीत असतो. त्याचे व्यक्तिमत्व, त्या माणसाच्या आयुष्यांतील घटना-प्रसंग इ. ना लेखकाच्या कल्पनेत जन्म मिळालेला असतो. त्यामुळे त्यांचे चरित्र लेखक घडवित असतो. कल्पित व्यक्तीच्या व्यक्तिचित्रांतही व्यक्तीचा जन्म लेखकाच्या कल्पनेत झालेला असतो. पण कथा आणि कल्पित व्यक्तिचित्र यांतील साम्य इथेच संपते. कारण कथेतल्या व्यक्तीचे चित्रण कथेतील कथानकाच्या अनुषंगाने करावे लागते. त्यामुळे कथेच्या संदर्भात त्या चित्रणाला समग्र आणि परिपूर्णता लाभत असते. अशी समग्रता किंवा परिपूर्णता कल्पित व्यक्तिपणाला लाभत नाही. कारण व्यक्तिचित्रे—

खऱ्यामाणसांची किंवा कल्पित माणसांची—

ही स्केचिस असतात. पोर्ट्रेट नसतात. पण दोन्हीकडे " मी " ला व्यक्ती

कशी भावली हेच महत्वाचे० पहिल्या प्रकारांत वि. दा. घाटे यांचे काही म्हातारे व एक म्हातारी[९] हे पुस्तक या पुस्तकांत गायकवाड महाराज, लक्ष्मीबाई टिळक, प्रोफेसर देसाई ही खरीखुरी माणसं व्यक्तिचित्राचा विषय होतात. ही माणसं आपल्याला कशी भावली हे घाटे सांगतात. त्यांचे चरित्र सांगत नाहींत म्हणून ती व्यक्तिचित्रे होतात व लालित्यामुळे ललितगद्यांत मोडतात. पु. ल. देशपांडे यांच्या[६] व्यक्ति आणि वल्ली[७] मधील व्यक्ति काल्पनिक पातळी-वरुन रंगविलेली आहेत. यांतला " नारायण" नवरा नाही पण त्याच्यासारखा खरा कोणी असेलही कारण पु. ल. " नारायण " कल्पिताच्या पातळीवरुन उभा करतात. येथील व्यक्तीच्या आयुष्यांतील घटनाप्रसंग काल्पनिक म्हणजे लेखक हवेतसे बनवतो. म्हणजे हा प्रकार डॅा. वर्तक म्हणतात त्याप्रमाणे Memory drawing सारखा आहे. दुर्गा भागवतांच्या " रूपरंग " " भावमुद्रा " ह्यांतील माणसे खरी असतीलही पण वाचकांसमोर केवळ त्यांचे " वाङ्‌मयीन[९] रूपच उभे राहते. " माणदेशी माणसं " मधील व्यक्तीही काल्पनिक पातळीवरचीच आहेत. पुंडलिकांच्या " आवडलेली माणसे " मधील व्यक्ती ह्या ख-याखु-या व्यक्ती आहेत. पण त्यांचे रेखाटनही प्राधान्याने [८] वाङ्‌मयीन " झाले आहे.

थोडक्यांत व्यक्तिचित्रासंबंधी दोन महत्वाच्या गोष्टी नोंदवता येतात.

१. कल्पित माणसाचे व्यक्तिचित्र जर लालित्यपूर्ण व्हावयाचे असेल, तर लेखक " मी " ची दृष्टी अधिक सूक्ष्म असणे आवश्यक आहे.
२. ख-या माणसाचे व्यक्तिचित्र रेखाटले जात असतांना लेखक " मी " त्या व्यक्तीला वाङ्‌मयीन रूप देऊ लागला, की त्याचे प्रत्यक्षांतील माणसाशी असलेले नाते संपुष्टांत येते. असे होते तेव्हाच ते व्यक्ति-चित्र कलात्मक व्यक्तिचित्र होते.

मराठीतील " व्यक्तिचित्रा" वरील नामवंत लेखक/पुस्तके खालील-प्रमाणे होत. वि. द. घाटे ( कांही म्हातारे व एक म्हातारी. १९३९) दि. वा. दिवेकर ( स्वभावचित्रे, १९३४), ग. त्र्यं. माडखोलकर ( माझे

आवडते लेखक १९३९,), वि. ह. कुलकर्णी ( व्यक्तिचित्रे १९४१), आचार्य अत्रे, ( दुर्वा आणि फुले १९४५), दुर्गा भागवत भावमुद्रा १९६०. रूपरंग १९६७, ), पु. ल. देशपांडे गणगोत १९७०, व्यक्ती आणि वल्ली १९६२ ), दुर्गा भागवत ( व्यासपर्व १९६२), इरावती कर्वे ( युगान्त १९६७), व्यंकटेश माडगूळकर ( माणदेशी माणसं १९६२).

## आठव्या दशकातील ग्रामीण ललितनिबंध

१९७० ते ८० या दशकांत कांही लेखक आपल्या ग्रामीण अनुभवाचा आविष्कार ललित निबंधांतून करताना दिसतात. भारतांत स्वातंत्र्योत्तर संक्रमण झाले. महाराष्ट्रही मागे राहिला नाही. गांधीजींच्या " खेड्या-कडे चला" या आदेशानुसार ग्रामजीवनाकडे शासनकर्त्यांचे लक्ष वेधले गेले. शिक्षण आणि सुधारणा यामुळे हा समाजही बदलूं लागला. थोडेफार शिकून चरितार्थासाठी शहरांकडे आलेल्या मनाची, संक्रमणकालातील द्विधा मनाची अवस्था कांही लेखकांनी ललितलेखांतून चितारली आहे. हे मन संवेदन-शील आहे, चिंतनशील आहे, त्याला गावकडच्या मातीची ओढ आहे, आणखी म्हणजे हे मन काव्यात्म स्पंदने टिपू शकते. नवसुशिक्षित, शहरवासी ग्रामीण मनाची स्पंदने या काळांतल्या ललितनिबंधात जाणवतात. ललितनिबंधाच्या या प्रकाराला सोईसाठी ग्रामीण ललितनिबंध " म्हणायला हरकत नाही. वास्तविक याचे प्रकटन श्री. वि. कुलकर्णी आणि मधुकर केचे यांनी ६५ ते ६७ दरम्यान केले होते. पण या दशकांत आणि पुढच्या कांही वर्षांत या प्रकारच्या लेखनाला बहर आल्याचे जाणवते. या दशकांत महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातून लेखकमंडळी पुढे येऊ लागली. या लेखकांनी ह्या अलक्षित जीवनाचा आणि मनाचा आपल्या परीने वेध घेण्याचा प्रयत्न चालविला. या नव्या ललितनिबंधकारानी आपल्या लेखनांतून प्रादेशिक जीवनाचे चित्रण करण्याचा सपाटा लावला. प्रादेशिक जीवन म्हटले की, प्रादेशिक बोली, आलीच [ ग्रामजीवनातील अनेक व्यवहार ढंगदारपणे चित्रित होऊ लागले. ह्या लेखकांचा ग्रामजीवनाशी साक्षात् संबंध असल्याने,

त्यांच्या लेखनातून त्यांचे संवेदनशील " मन प्रकट होऊ लागले. ग्रामसंस्कृतीच्या चित्रणाबरोबरच ह्या संवेदनशील मनाच्या अनेक परी अभिव्यक्त होऊ लागल्या. ग्रामसंस्कृतीत दलित संस्कृती मिसळून गेलेली असल्यामुळे ह्या गावकुसाबाहेरील जीवनाचे चित्रणही हे नवे लेखक करीत आहेत. हे नवे ग्रामीण ललितलेखक प्रमाणभाषेला अपरिचित अशा अनेक शब्दधनाचा पुरवठा करीत आहेत. ग्रामजीवनातला निसर्ग, ह्यातील व्यक्ती, घटना, लेखकाच्या पूर्वजीवनातील आठवणी यानी हे ललितनिबंध संपन्न होत आहेत. हे ह्या दशकांचे फळ असले, तरी ह्याला पूर्वसूरींचे थोडेफार ऋण आहेच हे ऋण ग. दि. माडगूळकर आणि शंकर पाटील यांचे आहे.

ग. दि. माडगूळकर ( मंतरलेले दिवस ). माडगूळकरांच्या जीवनात ज्या विविध व्यक्ती आल्या, ज्या वास्तूशी, स्थळाशी त्यांच्या भावतंबो-याच्या तारा जुळल्या त्यांच्याविषयी माडगूळकर अगदी गहिंवरुन लिहितात. हा गंहिवर कृत्रिम नसतो, किंवा त्यातून त्यांना स्वतः चा मोठेपणा दाखवायचा नसतो., तर त्यातून ग. दि. माडगूळकरांचे श्रध्दाळू सुसंस्कृत आणि भावशील अंतःकरण प्रकट होत असते. त्यांच्या सहवासात आलेल्या सामान्य व्यक्तिलाही एक ललित व्यक्तिमत्व प्राप्त होते. स्थल, वस्तू आणि व्यक्ती, यांचे भावसंपन्न व्यक्तिमत्व माडगूळकरांच्या लेखनांतून दिसू लागते. " मंतरलेले दिवस " मधील अनेक घटना -प्रसंगांना " सजीव " रुप प्राप्त झाल्यामुळे , लेखनाची खुमारी वाढलेली आहे.

शंकर पाटील - ( पाऊलवाटा ) ग्रामीण कथेला तिचे म्हणून अस्सल रुप देणारे शंकर पाटील ललित लेखनालाही एक वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त करुन देतात. त्यांच्या शैलीविशेषाने या लेखनाचे रुपसौष्ठवही देखणे झाले आहे. खेडयातील पाऊलवाटा शंकरपाटलांना मोहवतात. या वाटांशी त्यांचे आत्मीय भावबंध जुळतात. त्यामुळे या वाटा, वाटा रहात नाहीत. मानवी भावभावनांचे ते प्रतिनिधित्व करतात. या वाटा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांना कधी कमळ वेलीसारख्या दिसतात तर कधी हळदुली नवरी ! मळीची वाट, माळावरची तांबडी वाट, पाणंदीतून जाणारी वाट, वेशीला येऊन मिळणारी वाट पण प्रत्येक वाट वेगळी, वेगळगा ठेवणीची आणि म्हणून स्वतंत्र व्यक्तिमत्व लाभलेली. मार्मिक प्रतिमा, सूक्ष्म निरीक्षण, आशयघन छोटी छोटी वाक्ये यामुळे पाटलांचे लेखन आशयघन झाले आहे.

आनंद यादव यांचा " स्पर्शकमळे " हा ललितलेख संग्रह १९७०-८० या दशकाच्या अखेरीला म्हणजे १९७८ ला प्रसिध्द झाला. जीवन प्रवासातील निरनिराळ्या टप्प्यावर अगदी आठव्या-नवव्या वर्षापासून तो पन्नाशी पर्यंतच्या काळांत पुरूषाच्या जीवनांत स्त्री विविध शृंगार-रूपात कशी येऊ शकते आणि त्या विशिष्ट टप्प्यावर त्यांचे संबंध पुरूषाच्या मनांत कोणकोणत्या प्रेमांगांनी अवतरू शकतात, याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न प्रस्तुत संग्रहांत केलेला आहे, असे स्वतः आनंद यादव या पुस्तकाच्या प्रास्ताविकात सांगतात. आनंद यादव यांच्या वाङ्‌मयाच्या साकल्याने अभ्यास करणारे डॉ. रवीन्द्र ठाकूर "स्पर्श कमळे" विषयी म्हणतात - " साकल्याने विचार करता शृंगारिक गद्याचा आत्मनिष्ठ आविष्कार एवढीच या लेखनाची जमेची बाजू आहे. स्वतः लेखकच जेथे हे अनुभव कल्पनेच्या पातळीवर जगू पाहतो तेथे आस्वादाच्या पातळीवरही त्यांना पुरेसे मूल्य प्राप्त होऊ शकत नाही..... या लेखांची भाषाही कल्पनेच्या पातळीवरील अनुभव व्यक्त करण्यासाठी अनुकूल ठरावी अशी कृतककाव्यात्म आहे"[२२] याउलट " पापभरे " मधील लेखन वेगळ्या स्वरूपाचे आहे. स्वातंत्र्योत्तर कालांत ग्रामजीवनांत झपाट्याने बदल होत गेले. शहरी सुखसोई खेडयांत येऊन धडकल्या. साहजिकच खेडयातला माणूसही बदलला. खेडयातील माणसाचा हा कायापालट यादवांनी फक्त पाहिला नाही, तर त्याला आपल्या लेखनांत चिरंतन रूप दिले. ग्रामपंचायत, सोसायटी शाळा, नव्या सुधारणा, निवडणुका आणि तदनुषांगाने राजकारण या सर्व बाबतीत ग्रामीण माणसाचे मन बदलू लागले. ही बदललेली " मानसिकता ( Psycho-change) यादवांच्या ललितलेखनांत दिसून

येते. जुनी संस्कृति आणि नवी संस्कृती-दोन्हीतील ताणतणाव आणि ह्याचा संयमपूर्ण दंभस्फोट हे यादवांच्या ललितलेखनाचे विशेष आहेत.

अनंतराव पाटील यांचा ग्रामीण समाजजीवनावरील " झडीचे दिवस" हा ललितलेख संग्रह १९८१ साली प्रसिध्द झाला. ग्रामीण रीती-रिवाज, संस्कृती, ग्रामीण माणसे, त्यांची मनःस्पंदने , कौटुंबिकसंबंध त्यांचे दारिद्र्य हे सगळे " श्री " च्या नजरेने टिपले आहे. त्यामुळेच या आठवणी - हे अनुभवदर्शन ललितरम्य झाले आहे. तथापि हा ग्रामीण-समाज स्वातंत्र्यपूर्वकाळांतील आहे. एकदोन लेखांतून १९५० नंतरच्या राज-कारणाचा संबंध येतो. तथापि ते या लेखनाचे उद्दिष्ट नाही. प्रांजळ आत्मनिवेदन, सरळ आकलन सुलभ भाषा, लेखांची कालक्रमानुसार मांडणी यामुळे स्वातंत्र्यपूर्वकाळांतील ग्रामीण जीवनाचे एक सुसंगत चित्र " झडीचे दिवस " मधून उभे राहते.

शिवाजी सावंत ( लाल माती -रंगीत मने ), शांता शेळके ( आनंदाचे झाड ) व महादेव मोरे ( इथे फुलांना मरण जन्मता ) यानी सकसपणे ग्रामीण ललिलेखन केलेले असले, तरी त्यांचे लेखन संख्येने अल्प आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील कोकण, गोवा या भागावरही कांही ललित-लेखन झाले आहे. मधु मंगेश कर्णिक, सुभाष भेंडे आणि श्री. नेरुरकर ही त्यातली ठळक नांवे. सरोजिनी बाबर यांचे लेखन अधिकांशाने स्त्रीजीवना-संबंधी आहे. शंकरराव खरातांच्या लेखनांत " गावगाडा" सजीव होतो.

ललित गद्याच्या वाटचालीतील कांही नोंदी

१९८५ पर्यंतच्या ललितगद्याचा हा विकास पाहिल्यानंतर कांही गोष्टी ठळकपणे जाणवतात.

१. १९४५ पर्यंत जो फडकेप्रणित लघुनिबंध लिहिला जात होता तशा-प्रकारचा लघुनिबंध आज लिहिला जात नाही.

२. तो लघुनिबंध १९४५ नंतर ललितलेख, ललितनिबंध या नांवाने विकसित झाला. यासंदर्भात इरावतीबाई कर्वे, दुर्गा भागवत आणि गो. वि. करंदीकर यांचे योगदान मोलाचे आहे.

३. या नव्या ललितनिबंधाच्या प्रेरणा आणि प्रवृत्ती पूर्वीच्या लघु-निबंधाहून सर्वस्वी भिन्न होत्या. यासाठी वापरली जाणारी भाषाही नव्या वाङ्मयीन प्रेरणांनी प्रेरित झालेली आहे.

४. ललितनिबंधाचा एक फाटा " ग्रामीण ललित निबंध " म्हणून १९६५ ला सुरुवात आणि १९७० ते १९८० या दशकांत अधिक बहराला आलेला दिसतो.

५. ललितगद्याच्या उपप्रकाराबद्दल भिन्न भिन्न मते असून, ललित गद्याच्या विशेषांच्या आधारेच उपप्रकारांचे व्यवस्थापन होणे आवश्यक आहे.

६. ललित गद्याच्या एकूण अनुभवात आणि त्याच्या आविष्कारांत स्वातंत्र्योत्तर खूपच बदल झालेला आहे. तो स्वाभाविक आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत सर्वच वाङ्मयप्रकारांच्या प्रेरणा आणि प्रकृतीत बदल झालेला आहे.

७. ललितनिबंध , प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र, स्मरणाधारित लेखन थोडक्यात ललितगद्याचा कोणताहि उपप्रकार असो - आत्मनिष्ठा हे त्यांचे पायाभूत तत्व आहे हे सिद्द आणि सर्वमान्य झाले आहे. आणि आत्मनिष्ठा घेईल ते रूप हे त्या लेखनाचे आविष्काररूप ठरणे क्रमप्राप्त आहे. म्हणूनच जुना लघुनिबंध बदलला, प्रवासवर्णने, बदलली, व्यक्तिचित्रणे बदलली...हा बदल होत असतांना भाषाही बदलली. संवेदना, तरलता, काव्यात्मता, अनुभवातील चैतन्य पेलणारी भाषा या ललित गद्यात पहावयास मिळते. या ललिगद्याला नव्या

भाववृत्ती लाभल्या. जीवनाचा, जीवनातल्या सखोल अनुभवाचा तितक्याच सखोलतेने, व्यापकतेने, त्यांच्या गुंतागुंतीसह या ललितगद्याने वेध घेतला.

या पार्श्वभूमीवर प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे ललितलेखन येते. नलगे यांचे पहिले ललितगद्याचे पुस्तक गावाकडची माती" हे १९८४ साली प्रसिध्द झाले. त्यानंतर त्यांची चंद्रबनातल्या सावल्या आणि मंतरकैफ ही आणखी दोन पुस्तके प्रसिध्द झाली.

या तीनही पुस्तकांतील लेखन ग्रामसंस्कृतीशी निगडित आहे ग्रामीण समाजजीवनाचे दर्शन त्यांच्या तीनही पुस्तकांतून घडते. ग्रामीण संवेदनशीलता, गतकालाचे स्मरण, तदनुषंगिक आत्मनिष्ठा , काव्यात्मता, भूत आणि वर्तमान यांच्यातील ताणतणाव अचूकपणे टिपण्याची क्षमता, व्यक्तिचित्रणातील रेखीवपण, गावगाडयांतील बदलाचे भान, निसर्गभुली आणि या सर्वांचे निवेदन करणारी हळुवार, कवितेशी लगट करणारी भाषा यामुळे प्रा. नलगे यांच्या ललितगद्याला आगळे महत्व आले आहे. म्हणूनच त्यांच्या या तीनही पुस्तकांची प्रस्तुत शोध प्रबंधिकेसाठी निवड केलेली आहे.

या पुढच्या प्रत्येक प्रकरणातून त्यांच्या वरील पुस्तकांचा क्रमशः विचार करावयाचा आहे.

BARR. BA... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

## संदर्भटीपा


१. पाठक, यशवंत
ललित
ऑगस्ट १९८८ पृ. ५७

२. शेळके, शुभदा
ललित
मे-जून १९८६ पृ. ६७

३. शेळके, शुभदा
तत्रैव
पृ. ६७

४. पाडळकर, विजय
ललित
जुलै १९८९ पृ. ४७

५. बेंडखळे, अशोक
ललित
ऑगस्ट १९९२ पृ. ३९

६. कुलकर्णी भीमराव
प्रदक्षिणा ( ललित गद्य हा लेख )
सातवी आ. पृ. ३८१

७. अंबेकर, वि. बा.
तरंग आणि तुषार
प. आ. पृ. ७२

८. देऊळगावकर, वि. पां.
देऊळगावकर, चंद्रकांत
मराठी निबंध-लघुनिबंध: स्वरूप व विवेचन
प. आ. पृ. ९९

९. गाडगीळ, गंगाधर
खडक आणि पाणी
दुसरी आ. पृ. ३५१ व ३६०

१०. कोलारकर, रजनी
समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह
( समकालीन लघुनिबंध आणि नवलघुनिबंध हा लेख )
प. आ. पृ. १९१

११. खांडेकर, वि. स.
प्रदक्षिणा ( मराठीतील निबंध वाङ्मय हा लेख )
सातवी आ. पृ. २८७

१२. यादव, आनंद
वाङ्मयीन शैली आणि तंत्र
( " ललित गद्य " हा लेख )
प. आ. पृ. १८८-८९

१३. जोग, ल. ग.
निवडक ललित शिफारस
( गंगाजल " वरील लेख )
प. आ. पृ. १५ ते १७

१४. कुरुंदकर, नरहर
स्वप्नगंधा ( प्रस्तावना )
पहिली आ. पृ. ५

१५. यादव, आनंद
प्रदक्षिणा- खंड दुसरा
( स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य" हा लेख )
प. आ. पृ. २५६

१६. कोलारकर, रजनी
उनि
पृ. १९४

१७. यादव, आनंद
वाङ्.मयीन शैली आणि तंत्र
( " ललित गद्य" हा लेख )
आ. प. पृ. १८९

१८. वडेर, प्रल्हाद
आशय आणि आविष्कार
प. आ. पृ. १७

१९. यादव, आनंद
प्रदक्षिणा- खंड दुसरा
( स्वातंत्र्योत्तर काळांतील ललित गद्य" हा लेख )
आ. प. पृ. २६१

२०. पाडगांवकर मंगेश
पाण्याचे पंख
प. आ. मलपृष्ठ ३, 'ब्लर्ब' वरील मजकूर

२१. वर्तक, चंद्रकांत
वाङ्मयाचे अध्यापन
( ललितगद्य : अध्यापन दिशा" हा लेख )
प. आ. पृ. १७४

२२. ठाकूर, रवीन्द्र
आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय
प. आ. पृ. ६४